**नियमित दिवाणी दावा क्र.७३/२०१२**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००२०३–२०१२**

## निशाणी क्र.२१६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे कथन असे की, सदर कामातील प्रतिवादी यांनी दिलेल्या पुरशीसी वरुन प्रतिवादी क्र.५ जानकीबाई शामराव कदम ही मयत झाली असल्याचे समजले. प्रस्तुत प्रतिवादीस प्रतिवादी क्र.१ ते ४ हेच वारस आहेत. त्यांच्या व्यतिरीक्त अन्य वारस नाहीत. तरी प्रतिवादी क्र.५ चे नाव दाव्यातून कमी करावे अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश करण्यात यावा असे कथन केले आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.२१५ येथे पुरसीस दाखल करुन प्रतिवादी क्र.५ जानकीबाई शामराव या दि.१५/०६/२०२० रोजी मयत झाल्याचे कथन केले आहे. वादी यांच्या कथना नुसार मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारस पुर्वीपासूनच अभिलेखावर आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.५ यांचे निराळे वारस अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. वादी यांनी आपल्या अर्जात प्रतिवादी क्र.५ यांचे नाव कमी करण्याची मागणी केली आहे. अर्जातील कथने व सदर अर्जावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे याचा विचार केला असता वादी मागणी करतात त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास कोणतीही अडचण दिसत नाही. तसेच दाव्यात वादी मागणी करतात त्याप्रमाणे

दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. याउलट दावा मिळकती मधील वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण होण्यासाठी वादी यांनी अर्जात दिल्या प्रमाणे दुरुस्ती करणेस हरकत नाही. परंतु प्रतिवादी क्र.५ यांचे नाव दाव्यातून कमी झाल्यावर दाव्यामध्ये करावी लागणारी अनुषंगिक दुरुस्ती ही वादी यांनी करणे आवश्यक आहे. तरी वादी यांच्या अर्जातील कथनांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.२१६ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्या प्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.11 16:54:20 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः ११/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड